bajaj FOUNDATION

# प्रेस प्रकाशन:
# बजाज फाउंडेशन, विश्व युवक केंद्र जल व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन

**वर्धा** : 22 सप्टेंबर, बजाज फाऊंडेशन आणि विश्व युवक केंद्र (VYK) यांच्या वतीने 'कृषी-उद्योजकता आणि जलसंपत्ती व्यवस्थापन' या चार दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. नावाप्रमाणेच, कार्यशाळा आपल्यासारख्या देशासाठी या दोन महत्त्वाच्या क्षेत्रात भारतभरातील संघटनांच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देईल. या कार्यशाळेचे आयोजन 23 ते 26 सप्टेंबर या कालावधीत यात्री निवास, सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, वर्धा येथे करण्यात आले आहे.
कार्यक्रमाचे उद्‌घाटन शनिवारी सकाळी प्रमुख पाहुणे वर्ध्याचे आमदार डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित अन्य सन्मानित पाहुण्यांमध्ये वर्धाचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले (IAS), विश्व युवक केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी उदय शंकर सिंह आणि जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने यांच्यासह बजाज फाऊंडेशनचे अध्यक्ष (CSR) हरिभाई मोरी आणि क्षेत्रीय कार्यक्रम प्रबंधक महेंद्र फाटे यांचा समावेश होता.

यावेळी बोलताना डॉ. भोयर म्हणाले, "गांधीजी आणि विनोबाजींच्या भूमीत अशी महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल आम्ही बजाज फाऊंडेशन आणि विश्व युवक केंद्राचे आभार मानतो. आपल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी जलस्रोत विकास आणि व्यवस्थापनावर काम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे." जिल्हाधिकारी श्री कर्डिले यांनीही अशा प्रकारची कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल बजाज फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक केले व आभार मानले आणि आपल्या पाण्याचे जतन करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले.
"आपल्या जलस्रोतांचा विकास करण्यासाठी आम्हाला वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज आहे जेणेकरून ते शाश्वतपणे कार्य करू शकेल," असे जलतज्ज्ञ श्री कोटस्थाने म्हणाले.आपल्या भाषणात, श्री. मोरी यांनी "...लहान जमिनीची मालकी हा मुद्दा नाही" यावर जोर दिला. ते म्हणाले, "आम्हाला पीक-पेरणीच्या पद्धती बदलण्याची गरज आहे जेणेकरून लहान जमीनधारक देखील उपजीविका टिकवू शकतील."

bajaj FOUNDATION

या कार्यशाळेत सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही घटकांचा समावेश आहे, जेणेकरून प्रशिक्षण कक्षात जे शिकले जाते ते प्रत्यक्ष क्षेत्रातही अनुभवता येईल. देशाच्या समृद्धीसाठी दोन्ही संस्थांचा हा सार्थ प्रयत्न आहे.

बजाज फाउंडेशन आणि दिल्लीस्थित विश्व युवक केन्द्र ही सामाजिक विकासाच्या क्षेत्रातील दोन आघाडीची नावे आहेत. युवक आणि सामाजिक विकास उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी दोघेही देशभरातील समविचारी संघटनांसोबत सहयोग करत आहेत. अशा कार्यशाळांचा उद्देश सहभागी भागीदार संस्थांच्या प्रतिनिधींना मौल्यवान कौशल्ये प्रदान करणे हा आहे. या प्रतिनिधींनी, नव्याने आत्मसात केलेली कौशल्ये जलसंपदा व्यवस्थापन आणि कृषी क्षेत्रात आणखी खोलवर रुजविण्यासाठी कामाची ठरतात.जीवनासाठी आणि शेतीसाठी पाण्याची निरंतर उपलब्धता आवश्यक आहे. पिण्याचे शुद्ध पाणी आणि सिंचनाच्या पाण्याची कमतरता यासारख्या समस्या पृथ्वीला भेडसावत आहेत यासाठी जलस्रोतांचा विकास आणि व्यवस्थापन हाच एकमेव उपाय आहे.

बजाज फाउंडेशनबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी कृपया https://www.bajajfoundation.org/ वर जा VYK के साथी आपण https://www.facebook.com/VYKofficial?mibextid=ZbWKwL वर जाऊ शकता

For more information, please contact:

Shree Sanjay Ojha
Vice President, Corporate Communications
Ph: +91 9835314249
Email: skojha@bajaj-group.com